ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## Board of Management Meeting

### कार्यवृत्त

### Minutes of Meeting

**बैठक क्रमांक** (Meeting Number) : 200

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : शुक्रवार , दिनांक 28 मार्च 2025
**(Day and Date)** : Friday, 28 March 2025

**वेळ** (Time) : दुपारी 12.00 वाजता (12.00 pm)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

---

## 200 वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 200 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने शुक्रवार, दिनांक 28 मार्च 2025 रोजी दुपारी 12.00 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 03 | मा. डॉ. संजय भावे, मा. कुलगुरू कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 04 | मा. प्रा. वाल्मिक सरवदे, प्र-कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 05 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी श्री. अनिल गावित नाशिक | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 06 | मा. प्रा. एन. के. दास, स्कूल ऑफ एज्युकेशन, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिवर्सिटी, नवी दिल्ली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 07 | मा. श्री. नरेंद्र जोशी, अंबेजोगाई | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 08 | मा. डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 09 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 10 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 11 | श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 02 | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 03 | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 05 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |

| अनु.क्रमांक Subject No. | | तपशील Details |
|---|---|---|
| 200.1 | | **स्वागत**<br>मा. व्यवस्थापन मंडळाचे सदस्य सचिव श्री. दिलीप भरड यांनी ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने उपस्थित सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. |
| | | मा. कुलगुरू सरांनी विद्यापीठाच्या गेल्या महिन्याभरातील प्रगतीबाबत थोडक्यात माहिती दिली.<br>1. विद्यापीठात 'आंतरराष्ट्रीय मुक्त विद्यापीठ कुलगुरू परिषद' अशी तीन दिवसीय गोलमेज परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेसाठी विविध मुक्त विद्यापीठातील मा. कुलगुरूंनी सहभाग घेतला. परिषदेमध्ये मुख्यत्वे दूरशिक्षण, ऑनलाईन लर्निंगसाठी येणाऱ्या काळातील आव्हांनावर चर्चा झाली. 'मुक्त विद्यापीठाचा एक संघ' स्थापन करण्याचा ठराव या परिषदेत सर्व सन्माननीय कुलगुरूंच्या मान्यतेने संमत करण्यात आला. याद्वारे मुक्त विद्यापीठांपुढील विविध आव्हानांची, एखाद्या मुक्त विद्यापीठाने अंमलात आणलेली दूरशिक्षणातील प्रणाली, शैक्षणिक साहित्यांची देवाण-घेवाण या संघामार्फत केली जाईल. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील कृषी विज्ञान केंद्राचे कार्य, विद्यापीठाची सर्वोत्तम कार्यप्रणाली, परीक्षापद्धती आणि निकालपद्धती, सामाजिक विस्तार आणि कालाभिमुख राबविले जाणारे कार्य यांवर परिषदेसाठी आलेल्या मा. कुलगुरूंनी समाधान व्यक्त केले. त्यांतील काही प्रणाली आपापल्या विद्यापीठात राबविण्यासाठी य.च.म. मुक्त विद्यापीठ त्यांना सहकार्य करणार असल्याचे मा. कुलगुरूंनी विषद केले. मा. कुलगुरू व मुक्त विद्यापीठाच्या टीमचे आलेल्या ऑनलाईन व ऑफलाईन सर्व मा. कुलगुरूंनी अभिनंदन केले.<br>2. 'वाढवन बंदर (JNPA)' यांचेशी सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठातील सर्व संचालकांनी 'न्हावाशेव्हा' येथे भेट दिली. JNPA अधिकारी आणि विद्यापीठातील संचालक यांचेसोबत झालेल्या चर्चेनुसार विद्यापीठामार्फत राबविले जाऊ शकणाऱ्या आणि JNPA यांना आवश्यक असणाऱ्या कौशल्याधिष्ठीत 19 शिक्षणक्रमांची यादी विद्यापीठाला दिली. पैकी 17 शिक्षणक्रमांवर काम झाले असून पुढील महिन्यापासून केंद्र कार्यान्वित करून काम सुरू होईल.<br>3. 'पॉवरकॉन इंडिया' ही भारतातील पवन उर्जा क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असून अक्षय उर्जा पुरवठा करण्याचे काम या कंपनीकडून केले जाते. या कंपनीला विविध कौशल्यप्रवीण काम करणाऱ्या मनुष्यबळाची गरज असते. विद्यापीठाशी करार करून कंपनीच्या आवश्यकतेनुसार कौशल्याधिष्ठीत शिक्षणक्रम देण्यासंबंधी सामंजस्य करार करण्यात येणार आहे.<br>4. 'महायान पॉवर टूल' या कंपनीबरोबर सामंजस्य करार आला असून त्यांना सौदी अरेबियात 5000 अर्थमुव्हिंग ऑपरेटर्सची गरज आहे. अशा ऑपरेटर्सना विद्यापीठामार्फत कौशल्यविकास शिक्षण देण्यासाठी त्यांचेशी करार करण्यात आला आहे.<br>5. मा. राज्यपालांनी पदविदान समारंभात सुचित केल्याप्रमाणे कमी क्रेडिट पॉईंटचे भाषा शिक्षणक्रम विकसनाचे काम सुरू करण्यात आले आहे.<br>6. मा. कुलगुरूंनी विषद केलेल्या विद्यापीठाच्या प्रगतीबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी विद्यापीठाचे कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा नियंत्रक, वित्त अधिकारी, सर्व संचालक आणि संपूर्ण विद्यापीठ परिवाराचे अभिनंदन केले आणि अभिनंदनाचा ठराव संमत करण्यात आला. मा. कुलगुरू तथा अध्यक्ष यांच्या परवानगीने विषयपत्रिकेतील विषयांवर चर्चेस प्रारंभ करण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| 200.2 | 200.2.1 | **दिनांक 23 फेब्रुवारी 2025 रोजी झालेल्या 199 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दिनांक 23 फेब्रुवारी 2025 रोजी झालेल्या 199व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त सचिव श्री. भरड यांनी वाचून दाखविले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 200.2.2 | **दिनांक 23 फेब्रुवारी 2025 रोजी झालेल्या 199 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दिनांक 23 फेब्रुवारी 2025 रोजी झालेल्या 199व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीच्या कार्यवाहीचा अहवाल परीक्षा विभागातून प्राप्त झाला. 199व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत फक्त पदवीदान समारंभात प्रदान करावयाच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी यांच्या विषयीचा ठराव पारीत करण्यात आला होता. दि. 24 फेब्रुवारी 2025 रोजी झालेल्या पदवीदान समारंभात सदर पदविका, पदवी, पदव्युत्तर पदव्या प्रदान करण्यात आल्या. |
| 200.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 200.3.1<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठातील शिक्षकांना कॅस अंतर्गत द्यावयाच्या लाभाबाबत....**<br>**टिपणी** – डॉ. सुरेंद्र नरेंद्र पाटोळे- सहयोगी प्राध्यापक, डॉ. दयाराम दुधाराम पवार -सहायक प्राध्यापक, डॉ. सुभाष सोनुने- सहायक प्राध्यापक, डॉ. प्रकाश विजय बर्वे- उपग्रंथपाल या शिक्षकांच्या कॅस लाभाकरिता युजीसी तसेच शासन निर्णयानुसार प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व ग्रंथपाल यांच्या समितीतील तीन विषयतज्ज्ञांच्या नामनिर्देशनास मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मा. कुलगुरूंनी मंजुरी दिली होती. सदर नामनिर्देशनाचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी व्यवस्थापन मंडळासमोर सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** मा. राज्यपाल नामित सदस्यांकडून कॅससाठी वेळ देण्यात येते. त्यांनी दिलेल्या वेळेनंतर लगेच मा. व्यवस्थापन मंडळाची बैठक झाली नसल्याने मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मा. कुलगुरूंनी वरील नामनिर्देशनास मंजुरी दिली. मा. कुलगुरूंनी केलेल्या नामनिर्देशनास सन्माननीय सदस्यांनी कार्योत्तर मान्यता प्रदान केली. |
| | 200.3.2<br>आस्थापना कक्ष | **जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण, वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड येथे विशेष कार्यकारी अधिकारी (ओएसडी) या पदाची निर्मिती करणेबाबत ...**<br>**टिपणी** - जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (JNPA) वाढ़वण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (VPPL) आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्यात झालेल्या करारानुसार वाढवण बंदर प्रकल्पातील आणि आसपासच्या स्थानिकांसाठी शैक्षणिक आणि कल्याणकारी उपक्रमांचा एक भाग म्हणून संबंधित घटकांसाठी एकात्मिक कौशल्य आधारित व्यावसायिक, तांत्रिक आणि गरजांवर आधारित वाढवण, बंदर येथे इन्स्टिट्यूट स्थापन करण्याकरिता विशेष कार्यकारी अधिकारी या पदाची निर्मिती करण्यासाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (JNPA) वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (VPPL) आणि विद्यापीठ यांच्या झालेल्या करारानुसार विविध कल्याणकारी प्रकल्प राबविण्यासाठी एका केंद्राची निर्मिती करण्यात यावी. या केद्रात 'वरीष्ठ सल्लागार बंदर कौशल्य विकास प्रकल्प' हे पद निर्माण करावे. या पदासाठी नवीन व्यक्तीच्या नेमणूकीऐवजी बंदराच्या कामाची आणि कार्यप्रणालीची माहिती असलेल्या व्यक्तीची तेथे निवड करण्याची गरज आहे. JNPA मधून व्यवस्थापकीय संचालक म्हणून सध्याच सेवानिवृत्त झालेले श्री. जयवंत ढवळे यांना **'वरीष्ठ सल्लागार बंदर कौशल्य विकास प्रकल्प'** |

या पदाची जबाबदारी सोपवावी. त्यांना 'वेतन वजा निवृत्ती वेतन' येणारी रक्कम आणि रु. 10000/- अतिरिक्त भत्ता असे मानधन देण्यात यावे असे मा. कुलगुरूंनी प्रस्तावित केले. मा. कुलगुरूंनी प्रस्तावित केलेल्या प्रस्तावास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली. तसेच पुढील प्रशासकीय कार्यवाहीचे अधिकार मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.

200.3.3 कृषी विज्ञान केंद्र

**कृषी विज्ञान केंद्रामार्फत सारथी प्रायोजित कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण राबविण्यासाठी सामंजस्य करार करणेबाबत...**

**टिपणी** — मा. व्यवस्थापकीय संचालक, सारथी यांचे पत्र जा.क्र. सारथी / कृषी / वनामकृवि / फा.क्र. 76/21572025 दि. 01.01.2025 रोजीच्या पत्रानुसार छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांचेमार्फत 'व्यावसायिक शेळी व कुक्कुटपालन' आणि 'धिंगरी आळंबी उत्पादन व प्रक्रिया तंत्रज्ञान' या दोन विषयांवर विद्यापीठाच्या कृषि विज्ञान केंद्रामार्फत प्रशिक्षण राबविले जातील असे कळविले आहे. सदर दोनही प्रशिक्षण सारथी संचालक मंडळाने मंजूर केले आहे. सदर प्रशिक्षण सुरू करण्यापूर्वी सारथी व कृषि विज्ञान केंद्र यांमध्ये सामंजस्य करार करणे आवश्यक आहे. कृषी विज्ञान केंद्रामार्फत सारथी प्रायोजित कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण राबविण्यासाठी करावयाचा सामंजस्य करारास मा. कुलगुरूंनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिली आहे. सदर सामंजस्य करार कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर...

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : मा. व्यवस्थापकीय संचालक, सारथी यांचे पत्र जा.क्र. सारथी / कृषी / वनामकृवि / फा.क्र. 76/21572025 दि. 01.01.2025 रोजीच्या पत्रानुसार छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांच्या पत्रानुसार त्यांचेशी सामंजस्य करार करण्यात आला. सदर सामंजस्य करारास सर्व सन्माननीय सदस्यांनी कार्योत्तर मान्यता दिली.

200.3.4 विद्यार्थी सेवा विभाग

**विद्यापीठाच्या विभागीय केंद्रांची पुर्नरचना करणेबाबत...**

**टिपणी** — विभागीय केंद्र व त्यांचे अंतर्गत असलेले अभ्यासकेंद्र यांचेमार्फत विद्यार्थ्यांना प्रवेश, परीक्षा तसेच अन्य सोई सुविधा वेळेत व जलदगतीने मिळाव्यात यासाठी तसेच भारत सरकारच्या राजपत्रात प्रकाशित विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. 4 सप्टेंबर 2020 च्या शैक्षणिक धोरण अधिसूचनेतील कलम 2 (zb) नुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे महाराष्ट्रातील विभागीय केंद्रांची खालीलप्रमाणे पुनर्रचना करणेबाबत समितीत चर्चा करण्यात येऊन सर्वानुमते खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | विभागीय केंद्र | जोडण्यात येणारे जिल्हे |
|---|---|---|
| 1 | अमरावती विभागीय केंद्र | अमरावती, यवतमाळ |
| 2 | अकोला विभागीय केंद्र | अकोला, बुलढाणा, वाशिम |
| 3 | नागपूर विभागीय केंद्र | नागपूर, वर्धा, भंडारा |
| 4 | गडचिरोली विभागीय केंद्र | गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर |
| 5 | छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्र | छत्रपती संभाजीनगर, जालना |
| 6 | धाराशिव विभागीय केंद्र | धाराशिव, बीड |
| 7 | नांदेड विभागीय केंद्र | नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर |
| 8 | नाशिक विभागीय केंद्र | नाशिक, धुळे |
| 9 | अमळनेर विभागीय केंद्र | जळगाव, नंदुरबार |
| 10 | पुणे विभागीय केंद्र | पुणे, रायगड, अहिल्यानगर |

| | | |
|---|---|---|
| 11 | बारामती विभागीय केंद्र | पुणे जिल्ह्यातील (बारामती, इंदापूर, दौंड व सासवड ही तालुके), सोलापूर, सातारा |
| 12 | कोल्हापूर विभागीय केंद्र | कोल्हापूर, सांगली |
| 13 | रत्नागिरी विभागीय केंद्र | रत्नागिरी, सिंधुदुर्ग |
| 14 | मुंबई विभागीय केंद्र | मुंबई शहर व उपनगरे |
| 15 | ठाणे विभागीय केंद्र | ठाणे, पालघर |

नांदेड विभागीय केंद्रांतर्गत लातूर येथे Satelite केंद्र विद्यापीठाच्या ध्येय, धोरणे, उद्दिष्टे प्रभावीपणे राबविण्यासाठी 'मसाविका' 2016 मधील कलम 2(48) च्या धर्तीवर सदर केंद्र प्रस्तावित करावे अशी शिफारस समितीने केलेली आहे.

वरीलप्रमाणे विभागीय केंद्रांची पुनर्रचना करणेबाबत समितीत सर्वानुमते निर्णय घेण्यात आलेला असून प्राधान्याने बारामती व अमळनेर हे दोन विभागीय केंद्र कार्यान्वित करावेत तसेच तेथे लागणारे मनुष्यबळ समितीने सुचविल्यानुसार उपलब्ध करून द्यावे सदर मनुष्यबळ अहवाल सोबत जोडलेला असून उर्वरित पाच विभागीय केंद्रे टप्याटप्याने सुरू करण्यात यावेत अशी सर्वानुमते शिफारस करण्यात आली. या प्रस्तावास मा. विद्वत परिषदेच्या दि. 23-फेब्रुवारी-2025 रोजी झालेल्या 66 व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** वरील विषयाबाबत मा. कुलगुरूंनी सर्व सदस्यांना सध्याच्या विभागीय केंद्रांना जोडण्यात आलेल्या जिल्ह्यांचे आणि विभागीय केंद्रांचे भौगोलिक अंतर लक्षात घेता विद्यार्थ्यांना विभागीय केंद्राशी संपर्क साधण्यात अडचणी येतात. तसेच प्रवेश, परीक्षा यांमध्येही अडचणी येतात. येत्या काळात विविध शिक्षणक्रमांची रचना होणार असून विद्यार्थ्यांना सोयीचे होण्यासाठी ही पुनर्रचना आवश्यक आहे असे विशद केले. तसेच ही रचना टप्प्याटप्प्याने आचरणात आणली जाईल असेही विशद केले.

सबब, सर्वप्रथम प्राधान्याने 'बारामती' येथील विभागीय केंद्र कार्यान्वित करावे. तद्नंतर टप्प्याटप्प्याने बाकीची केंद्रे कार्यान्वित करण्यात येतील. या प्रस्तावाला दि. 23 फेब्रुवारी 2025 रोजी झालेल्या 66 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीत ठराव क्र. 66.3.6 नुसार मान्यता दिलेली आहे. मनुष्यबळाबाबत मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि. 18-जुलै-2024 रोजीच्या 194.3.2 या ठरावाप्रमाणे राहील. मा. विद्वत परिषदेच्या ठराव क्र. 66.3.6 या ठरावाला सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली.

200.3.5
सभा व दप्तर कक्ष

**विद्यापीठातून सेवानिवृत्त होऊन विद्यापीठात करारावर सेवा देणाऱ्या सेवानिवृत्त सेवकांना श्री. गुरूजी रूग्णालयाच्या सेवा मिळणेबाबत...**

**टिपणी** – शासनमान्यतेअभावी भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याने विद्यापीठ सेवेतून निवृत्त होणाऱ्या सेवकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त राहतात. त्यामुळे कार्यरत सेवकांवर कामाचा अतिरिक्त ताण पडतो. परिणामी सेवा निवृत्त होणाऱ्या सेवकांमधून त्यांची उपयुक्तता, कर्तव्य व जबाबदाऱ्या, कार्यतत्परता इ. विचारात घेऊन निवडक कर्तव्यदक्ष सेवकांना पुन्हा करारावर रुजू करून घेण्यात येते.

अशा विद्यापीठातून सेवानिवृत्त होऊन विद्यापीठात करारावर सेवा देणाऱ्या सेवानिवृत्त सेवकांना श्री. गुरूजी रूग्णालयाच्या सेवा मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर.....

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** नवीन भरती प्रक्रिया होईपर्यंत विद्यापीठाला आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाची गरज विद्यापीठातूनच सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा करारावर घेऊन भागविली

| | | |
|---|---|---|
| | | जात आहे. याच सेवकांना सेवानिवृत्तीपूर्वी श्री.गुरुजी रुग्णालयाकडून आरोग्यसेवा पुरविण्यात येत असे. आता त्यातीलच काही कर्मचारी करारावर सेवा देत आहेत.<br>नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणेच 'विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या आणि करारावर सेवा देणाऱ्या' कर्मचाऱ्यांना श्री.गुरुजी रुग्णालयाची आरोग्यसेवा देण्यात यावी याबाबतचा प्रस्ताव मा. कुलगुरूंनी मांडला. सदर सेवा ही कल्याणकारी सेवा असल्याने मा. कुलगुरूंनी मांडलेल्या प्रस्तावास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 200.3.6<br>स्कूल ऑफ ऑनलाईन लर्गिंग आणि आस्थापना कक्ष | **'School of Online Learning' या विद्याशाखेचे नामभिधान 'School of Digital Education' असे करणेबाबत....**<br>**टिपणी** - 'School of Online Learning' या विद्याशाखेची स्थापना व्यवस्थापन मंडळ ठराव 188.3.16 नुसार करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शिक्षण पध्दतीत झालेले व येऊ घातलेले बदल लक्षात घेता, मुक्त, दूरस्थ व Online Learning या नामाभिधानामुळे येणाऱ्या मर्यादा दूर करण्यासाठी 'School of Online Learning' या विद्याशाखेचे नामभिधान 'School of Online Education' असे करण्यास मा. कुलगुरूंनी मा. विद्वत परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सदर प्रस्ताव विषय दि. 23 फेब्रुवारी 2025 रोजी झालेल्या 66 व्या विद्वत परिषदेत कार्योत्तर मंजुर करण्यात आला आहे. सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरूंनी दिलेल्या 'School of Online Learning' या विद्याशाखेच्या 'School of Online Education' या नामाभिधानाला मा. व्यवस्थापन मंडळाच्या ठराव क्रमांक 198.4.6 नुसार मा. विद्वत परिषदेच्या वतीने मान्यता देण्यात आली होती. परंतु विद्यापीठ 'डिजीटल युनिर्वसिटी' कडे वाटचाल करीत आहे आणि या विद्याशाखेमार्फत राबविले जाणारे शिक्षणक्रमही 'Digitally' उपलब्ध करून दिले जात आहेत. सबब या विद्याशाखेचे नामाभिधान 'School of Online Education' ऐवजी 'School of Digital Education' असे करण्याच्या मा. कुलगुरूंच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता दिली. तसेच या विद्याशाखेअंतर्गत 'Center for Online Education' या केंद्राची स्थापना करून दूरशिक्षण परिषदेच्या निकषांनुसार सर्व शिक्षणक्रमांची रचना करावी. या प्रस्तावास दि. 23-फेब्रुवारी-2025 झालेल्या 66 व्या विद्वत परिषदेत ठराव क्र. 66.3.4 नुसार मंजुरी देण्यात आली. मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेनंतर सदर विद्याशाखेचा समावेश अध्यादेशात करण्यात येणार असल्याचे मा. कुलगुरुंनी विषद केले. मा. विद्वत परिषदेच्या 66.3.4 या ठरावास व मा. कुलगुरुंनी मांडलेल्या या प्रस्तावास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 200.3.7<br>वित्त विभाग | **दि. 25 मार्च 2025 रोजी आयोजित वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर....**<br>**टिपणी** — दि. 25 मार्च 2025 रोजी वित्त समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. सदर समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर ....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** मा. वित्त समिती सभा क्र. 19/2024-25 दि. 25 मार्च, 2025 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वित्त अधिकारी यांनी सभेपुढे मांडले. त्यातील विविध विषयातील ठळक मुद्यांची माहिती मा. वित्त अधिकारी यांनी सादर केली. सदर बैठकीतील सर्व विषयांवर चर्चा होऊन मान्य करण्यात आले तसेच खालील विषयांच्या बाबतीत सविस्तर चर्चा करण्यात आली.<br>**<u>वित्त समिती विषय क्र. 05 :</u>** विद्यापीठाच्या विविध मालमत्तांचे आर्थिक वर्ष 1989-90 ते 2023-24 या कालावधीच्या सर्व प्रमाणकांच्या नोंदीनुसार विविध मालमत्ता नोंदवह्या व इतर अभिलेखे अद्ययावत करून घेणे व चालू आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये त्यानुसार पुढील नोंदी घेण्याबाबतचा विषय वित्त समितीमध्ये |

चर्चा करून मान्य करण्यात आला. त्यानुसार व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत 35 वर्षाच्या नोंदीचे सविस्तर अवलोकन करण्यात आले. विविध खात्यांवरील अंतिम नोंदी घेण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच विविध सात सनदी लेखापालांच्या फर्मनी केलेल्या कामाची प्रशंसा करण्यात आली. वित्त अधिकारी यांनी या अनुषंगाने सविस्तरपणे निवेदन बैठकीत सादर केले. सात सनदी लेखापालांनी दिलेल्या अहवालांचे एकत्रिकरण करून अंतिम नोंदी करण्यात आल्या त्या नोंदींप्रमाणे यापुढील वर्षात प्रारंभिक नोंदी ग्राह्य धरण्यास मान्यता प्रदान झाली. उपरोक्तप्रमाणे प्रदिर्घ कालावधीपासून प्रलंबित असलेले काम योग्य पध्दतीने पुर्ण करून विद्यापीठाला आर्थिक शिस्त लावल्याबद्दल वित्त अधिकारी व वित्त विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात आला.

**वित्त समिती विषय क्र. 06 :** सात सनदी लेखापालांनी केलेल्या अहवालांचे एकत्रिकरण करण्यास, त्यासाठी विद्यापीठाचे सनदी लेखापाल मे. ए. एस. बेदमुथा यांच्याकडून सदरचे काम करून घेणेस व त्यासाठी त्यांची व्यावसायिक फीस निश्चित करतांना वरील सात सनदी लेखापालांना दिलेल्या व्यावसायिक फीसच्या 15 % प्रमाणे रु. 8,40,000/- (रुपये आठ लक्ष चाळीस हजार फक्त) अधिक GST एवढी व्यावसायिक फीस अदा करण्यास व मा. कुलगुरु महोदयांनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेच्या अधिन राहून केलेल्या नियुक्तीस सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**वित्त समिती विषय क्र. 07 :** विद्यापीठ अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या वैयक्तिक कामासाठी विद्यापीठाचे वाहन व विद्यापीठाचे गेस्ट हाऊस वापराचे दर निश्चित करणेबाबतचा विषय यासंदर्भाने नेमण्यात आलेल्या समितीने निश्चित केलेल्या दरास वित्त समितीने केलेली शिफारस मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्य करण्यात आली.

**वित्त समिती विषय क्र. 10 :** विद्यापीठ सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेत केलेल्या कामाबाबत देण्यात येणाऱ्या विविध मानधनाबाबत.

**ठराव :** वित्त समितीने शिफारस केलेल्या खालील मुद्यांच्या अनुषंगाने शिफारस केल्यानुसार मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली व खालीलप्रमाणे मान्य करण्यात आले.

01 शैक्षणिक संवर्गातील व्यक्तींनी जर सुटीच्या दिवशी सदरचे केवळ समंत्रणाचे काम केले असेल अथवा प्रश्नपेढी तयार करणे, प्रोजेक्ट तपासणे, अशी तत्सम कामे केली असतील तरच अशा व्यक्तींना वेतनाव्यतिरिक्त सदरच्या कामाचे मानधन अदा करता येईल. संबंधित विभागाच्या संचालकांनी व अधिकारी यांनी देयकावर प्रमाणित केलेले असेल तरच देयक अदा करण्यात येईल.

02 त्याचप्रमाणे शिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत केलेल्या कामाचा मोबदला कोणत्याही परिस्थितीत देय असणार नाही. विद्यापीठांना लागू असलेल्या समान लेखा संहितेतील विविध नियमानुसार ही बाब आर्थिक शिस्तीस धरून नाही.

03 यापूर्वी अदा करण्यात आलेली देयके वगळून सध्या वित्त विभागात अंतर्गत व्यक्तींची थांबवून ठेवलेली देयके अदा करण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरविण्यात आले. वित्त विभागात प्राप्त देयके संबंधित विभागास परत पाठविण्यात यावीत.

04 वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील एम. कॉम. व एम. बी. ए. शिक्षणक्रमाचे प्रोजेक्ट हे कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त, सुटीच्या दिवशी अथवा घरी तपासले असल्यास त्याची देयके अदा करण्यात यावीत. तसे संबंधित संचालकांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्यासंदर्भाने केलेल्या प्रशासकीय कामाचे मानधन देयक अदा करण्यात येणार नाही.

05 त्याचप्रमाणे प्रशासकीय अधिकारी कर्मचारी यांना देखील काही प्रकारची मानधन देण्याबाबतचे देयके वित्त विभागात प्राप्त झालेली आहे. (त्यात पी.पी.टी. बनविणे व तत्सम देयके) सदरचे काम हे प्रशासकीय कर्मचाऱ्याचे असल्याने त्याचे वेगळे मानधन देण्याची आवश्यकता नाही. त्यांचा तो नियमित कामाचा भाग असल्याकारणाने वेगळे मानधन देण्यात येऊ नये. तसेच संचालकांनी देखील अशा प्रकारचे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवू नये.

06 कोणत्याही कामाचा प्रशासकीय मंजुरीच्या प्रस्तावात प्रत्येक कामाचे स्पेसिफिक खर्चाचा उल्लेख करावा. एकत्रित मान्यता मानधन अदायगीच्या प्रकरणात नियमबाह्य ठरते. असे प्रस्ताव पाठविले असल्यास ते परत मागविण्यात यावे. त्याचप्रमाणे असे प्रस्ताव वरिष्ठांनी अग्रेषित किंवा मान्य करू नये.

07 कार्यालयीन वेळेत वरिष्ठांनी सोपविलेली सर्व कामे ही शैक्षणिक तसेच प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांना करणे बंधनकारक असल्या कारणाने त्याचे वेगळे मानधन देण्याची आवश्यकता नाही.

उपरोक्तप्रमाणे सविस्तर चर्चा होऊन मानधनाबाबत नियमाचे पालन व्हावे असे सर्वानुमते ठरले. त्याप्रमाणे त्वरीत अंमलबाजावणी करण्यात यावी असे वित्त विभागास निर्देशित करण्यात आले.

**<u>वित्त समिती विषय क्र. 11 :</u>** वसंत ठकार फाउंडेशनतर्फे मतीमंद (दिव्यांग) मुलांसाठी उपक्रम सुरु करण्यासाठी 10,00,00,000/- (रुपये दहा कोटी फक्त) देणगी स्वरुपात स्वीकारणेबाबत.

**ठराव :** वरीलप्रमाणे वसंत ठकार फांडेशन यांनी देऊ केलेली रु. 10,00,00,000/- (रुपये दहा कोटी फक्त) स्विकारण्यात यावी असे एकमताने ठरले. तसेच सदर रकमेतून दिव्यांगाकरिता विद्यापीठामार्फत सुरु करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण केंद्रास त्यांचे नाव देण्याच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याप्रमाणे वसंत ठकार फांउंडेशन ठरवतील त्याप्रमाणे नाव देण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**<u>वित्त समिती बैठकीतील कार्योत्तर मान्यतेचा विषय क्र. 01 :</u>** विद्यापीठाच्या मुदतठेव पावत्यांना पुढील कालावधीकरिता मुदतवाढ देणेबाबत झालेल्या गुंतवणुक समितीच्या इतिवृत्तास मान्यता मिळणेबाबत.

**ठराव :** गुंतवणुक समिती बैठकीत झालेल्या निर्णयानुसार व त्यास वित्त समिती बैठकीतील ठरावावर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे अ. क्र. 01 ते 03 प्रमाणे सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

01 विद्यापीठाच्या विविध बँकामध्ये वरीलप्रमाणे ठेवी ठेवलेल्या असून, त्यांची मुदत दि. 31 मार्च, 2025 पर्यंत संपुष्टात येत आहे. मूळ टिपणीतील अ.क्र. 01 ते 06 मधील ठेवी 1.99 कोटीच्या पटीत आहे. सदर मुदत ठेवींना 46 दिवसांकरिता मुदत वाढ देण्यात यावी असे ठरले.

02 मूळ टिपणीतील अ.क्र. 07 मधील पंजाब नॅशनल बँकेमधील ठेवींबाबत खर्चाचा ताळमेळ लक्षात घेऊन उर्वरित रक्कम तात्पुरत्या स्वरुपात गुंतवणुक करण्यात यावी असे ठरले.

03 मूळ टिपणीतील अ.क्र. 08 मधील एच.डी.एफ.सी. बँकेची गुंतवणुकीची मुदत दि. 21.03.2025 रोजी संपत आहे. त्यामुळे मागील गुंतवणुक जेवढ्या कालावधीची होती तेवढ्याच कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.

**<u>वित्त समिती ऐनवेळचा विषय क्र. 02 :</u>** विद्यापीठाचा बनविण्यात आलेल्या मानदंडाच्या उरलेल्या चांदीबाबत.

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव :** दि. 24 फेब्रुवारी 2025 रोजी झालेल्या पदवीदान समारंभाकरिता नवीन ज्ञानदंड बनविण्यात आला. सदर ज्ञानदंड बनविण्याकरिता विद्यापीठाने 3 किलो चांदी खरेदी करून संबंधित ज्ञानदंड बनविणाऱ्या कारागिराकडे दिली होती. त्यातील ज्ञानदंडाकरीता एकूण 2378.200 मिली ग्रॅम चांदी वापरण्यात आली. उर्वरित 621.960 मिली ग्रॅम चांदी शिल्लक राहीली असून सदर चांदी परीक्षा विभागाने वित्त विभागाच्या ताब्यात दिली आहे. त्यानुसार सदर विषय वित्त समितीच्या बैठकीत ठेवण्यात आला होता. मा. प्र-कुलगुरु महोदयांनी याबाबत मांडलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने खालीप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.<br>01 उपरोक्त चांदीच्या वजनात मिली ग्रॅम शब्दाऐवजी केवळ ग्रॅम शब्द वाचावा.<br>02 2378.20 ग्रॅम + 621.960 ग्रॅम = 3000.160 ग्रॅम हे चुकुन झाले असून याबाबत खालीलप्रमाणे दुरुस्ती समजावी.<br>अ) तयार ज्ञानदंडाचे एकूण वजन 3768.000 ग्रॅम<br>आ) त्यातील सागवाणी दंडाचे वजन 1581.200 ग्रॅम<br>इ) ज्ञानदंडासाठी लागलेली एकूण चांदी 2186.800 ग्रॅम<br>ई) घडाईच्या प्रक्रियेतील एकूण घट 191.240 ग्रॅम<br>उ) शिल्लक चांदी 621.960 ग्रॅम |
| 200.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 200.4.1 आस्थापना कक्ष | **दि. 1 मे 2025 पासून रिक्त होणाऱ्या कुलसचिव पदावर Fixed/Tenuare करार पद्धतीने नेमणूकीबाबत...**<br>**टिपणी** — विद्यमान कुलसचिव, श्री. दिलीप भास्करराव भरड हे नियम वयोमानानुसार दि. 30 एप्रिल, 2025 रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे दि. 1 मे, 2025 पासून कुलसचिव पद रिक्त होणार आहे. सदर पद रिक्त झाल्यानंतर जाहिरात, छानननी, निवड, निवड समितीच्या शिफारशी या प्रक्रियेनंतर नियुक्ती होऊन संबंधित उमेदराव रुजू होण्यासाठी कालावधी लागणार आहे. त्या कालावधीपर्यंत विद्यापीठाच्या परिनियम क्र. 11 (2 of 1993) तरतुदीनुसार मा. कुलगुरूंना ते निश्चित करतील एवढ्या कालावधीसाठी Fixed/Tenuare करार पद्धतीने नियुक्ती किंवा पदावरील व्यक्तीला मुदतवाढ देण्याचे अधिकार आहेत. करिता, दि. 1 मे, 2025 पासून रिक्त होणाऱ्या कुलसचिव पदावर विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) व इतर अनुषांगिक संबंधित तरतुदीनुसार दि. 30 एप्रिल, 2025 रोजी कुलसचिव पदावरून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे श्री. दिलीप भरड यांच्या Fixed / Tenuare करार पद्धतीने विहित प्रक्रियेचा अवलंब करून नियुक्ती करणेसाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** वरील प्रस्तावाविषयी आणि परिनियमातील तरतुदीविषयी मा. कुलगुरुंनी मा. व्यवस्थापन मंडळ सदस्यांना अवगत करून दिले. करारावरील नियुक्तीसाठी नियत वयोमानानुसार विद्यापीठ, शैक्षणिक संस्था, राज्य/केंद्र शासनातील किंवा प्रतिष्ठित खाजगी संस्थातून सेवानिवृत्तीनंतर वयाच्या 65 वर्षापर्यंत पात्र राहील. करारावर नियुक्ती करताना वेतनमान मा. व्यवस्थापन मंडळ निश्चित करील एवढे असेल. तथापि, वेतन वजा निवृत्तीवेतन किंवा वेतन वजा अनुमानित निवृत्तीवेतन या तत्वार करण्यात येईल.<br>करार पद्धतीनुसार नियुक्तीसाठी समितीचे गठण करावयाचे असते. समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असतो. |

| | | |
|---|---|---|
| | | 1. मा. कुलगुरू, अध्यक्ष<br>2. मा. कुलगुरुंनी नामनिर्देशित केलेले एका विद्याशाखेचे विद्याशाखा संचालक<br>3. मा. व्यवस्थापन मंडळाने नामनिर्देशित केलेले एक व्यवस्थापन मंडळ सदस्य<br>4. मा. कुलगुरूंनी नामनिर्देशित केलेले विद्यापीठाशी संलंग्न नसलेले परंतु सहयोगी प्राध्यापक व त्यावरील पदाला समकक्ष असलेले तीन सदस्य<br>5. मा. संचालक, उच्च व तंत्रशिक्षण सहयोगी प्राध्यापकाशी समकक्ष असलेल्या पदासाठी<br><br>करारावरील नियुक्ती प्रक्रिया राबविण्यासाठी मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने गठीत करावयाची असते. त्यानंतर समितीच्या कामकाजाचा अहवाल येणाऱ्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सादर करता येईल आणि 1 मे पासून रिक्त होणाऱ्या कुलसचिव पदासाठीचे कामकाज सुरू करता येईल. त्यामुळे उक्त कार्यवाही 30 एप्रिलपूर्वी करण्यात यावी असे ठरले. करारावरचा कालावधी हा 1 वर्ष ते 2 वर्षांपर्यंत ठेवावा असे निवेदन मा. कुलगुरूंनी विषद केले.<br><br>मा. कुलगुरूंनी केलेल्या निवेदनास सर्व सन्माननीय सदस्यांनी एकमताने मान्यता प्रदान केली. तसेच क्रमांक 3 साठी नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना प्रदान करण्यात आले. |
| | 200.4.2<br>ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखा आणि आस्थापना कक्ष | **ग्रामीण विकास आणि उद्योजकता विद्याशाखा निर्माण करणेबाबत ....**<br>**टिपणी** — विद्यापीठामार्फत ग्रामविकासाचे अनेक उपक्रम राबविले जात आहेत. तसेच यशवंत दत्तक ग्राम योजना घोरवड व घनशेत येथे यशस्वीपणे सुरु आहे. या अंतर्गत विद्यापीठामार्फत वेळोवेळी अनेक समाजपयोगी उपक्रम राबविण्यात येत असतात. महाराष्ट्र राज्यात 29,000 पर्यंत ग्रामपंचायती असून कृषी व कृषीआधारित व्यवसायांवर आजही राज्यातील बहुसंख्य नागरिक अवलंबून आहेत. त्यामुळे कृषी व कृषीसंलग्न व्यवसायात अनेक रोजगारांच्या संधी उपलब्ध असून कौशल्याधिष्ठित युवकांची मोठ्या प्रमाणात गरज भासत आहे. विद्यापीठात नव्याने ग्रामिण विकास आणि उद्योजकता विद्याशाखा निर्माण केल्यास या विद्याशाखेमार्फत ग्रामिण विकास, कृषी व कृषीसंलग्न, महिला सक्षमीकरण, कौशल्याधारित या संदर्भातील अनेक शिक्षणक्रम राबविता येतील. त्यानुसार या विद्याशाखेमार्फत अल्प कालावधीच्या प्रमाणपत्रा शिक्षणक्रमांबरोबरच पदविका, पदवी, पदव्युत्तर शिक्षणक्रमही राबविता येऊन ग्रामिण भागात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतील.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** 'एम. ए. ग्रामीण विकास'वर विद्यापीठात बरेच काम सुरू असून त्यासाठी स्वतंत्र विद्याशाखा असणे गरजेचे आहे. ह्या प्रस्तावास मा. विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरूंनी मान्यता दिली आहे. सदर विद्याशाखेचा परिनियमात समावेश करण्याची रितसर प्रक्रिया करावी अशी शिफारस करण्यात आली. सर्व सन्माननीय सदस्यांनी 'ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखा' निर्मितीस एकमताने मान्यता दिली. |
| | 200.4.3<br>आस्थापना कक्ष | **करारावरील पुनर्नियुक्तीबाबत ....**<br>**टिपणी** — विद्यापीठात परिनियम क्र. 11 (2of 1993) अन्वये एकूण 3 वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करण्याची तरतूद आहे. त्यात मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत 2 वर्षे व एक वर्षे व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने नियुक्ती करता येते.<br>1. त्यानुसार मुंबई विभागीय केंद्रातील श्रीमती जान्वी करमासे, संयोजक (प्रशासकीय) यांना मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने 1 वर्षापैकी 6 महिने कालावधीसाठी नियुक्ती देता येऊ शकते.<br>2. श्री. प्रकाश गोविंद पाटील, संयोजक (तांत्रिक) बांधकाम व देखभाल कक्ष यांना मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने 1 वर्षापैकी 6 महिने कालावधीसाठी नियुक्ती देता येऊ शकते. |

| | | |
|---|---|---|
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव :** वरील दोनही करारावरील संयोजकांना पुढील 6 महिन्यांसाठी नियुक्ती देण्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली. |
| | 200.4.4<br>विज्ञान विद्याशाखा आणि आस्थापना कक्ष | **'Yash Center for Biodiversity Conservation at the School of Sciences, YCMOU' ह्या केंद्राच्या निर्मितीच्या मान्यतेबाबत ....**<br>**टिपणी** — विद्यापीठाच्या परीसरात विविध प्रकारच्या पक्षांच्या प्रजाती आहेत. त्यांचा शास्त्रीय जैवविविधतेच्या दृष्टीकोनातून अभ्यास व्हावा यासाठी या केंद्राच्या स्थापनेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाच्या परीसरात विविध प्रकारच्या पक्षांच्या प्रजाती आहेत. त्यांचा शास्त्रीय जैवविविधतेच्या दृष्टीकोनातून अभ्यास व्हावा तसेच त्यांची ओळख बाहेरील व्यक्तींना व्हावी. यातून वेगवेगळे संशोधन करता येईल. संशोधनासाठी वेगवेगळ्या संस्थांकडून 'संशोधन अनुदान' प्राप्त करून त्याद्वारे संशोधनाला चालना देता येईल असा या केंद्राच्या स्थापनेमागचा उद्देश आहे. सदर संशोधन केंद्राचे काम विज्ञान विद्याशाखेअंतर्गत चालवले जाणार आहे. या उद्देशातून सदर केंद्राच्या स्थापनेस सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली. तसेच सदर केंद्राचे प्रारूप निश्चित करण्यासाठी मा. कुलगुरू यांनी समिती स्थापन करून प्रारूप अहवाल मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी ठेवावा असेही ठरले. |
| | 200.4.5<br>सभा व दप्तर कक्ष | **सामंजस्य करारांना मान्यता मिळणेबाबत ....**<br>**टिपणी** — मागील महिन्याभरात पुढील वेगवेगळ्या संस्थांशी रोजगाराभिमुख आणि कौशल्याधिष्ठीत शिक्षणासंबंधी सामंजस्य करार करण्यात आले.<br>1. Core LLP Power House, Baner, Pune<br>2. NAB (National Association for the Blind, Maharashtra, Nashik for Special B.Ed. (Study Center)<br>3. Prabodhini Vidya Mandir, Shir Mai Lele Sharvan Vikas Vidyalaya & NAB Nashik (Specail B.Ed. Study Center)<br>4. JNPT and Vidhavan Port Project Ltd., Nariman Point Mumbai<br>5. Mahayaan Global Equipment Solutions Pvt. Ltd., Nashik<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाने केलेल्या विविध संस्थांशी वेगवेगळ्या शिक्षणक्रमांशी निगडित सामंजस्य करार केले आहे. याची माहिती मा. कुलगुरूंनी मा. सदस्यांना करून दिली. वरील सामंजस्य करारांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | | **सर्व विषयांवर चर्चा होऊन सर्व सन्माननीय सदस्यांनी बैठकीत महत्त्वपूर्ण योगदान देऊन विद्यापीठाच्या प्रशासकीय आणि शैक्षणिक कामकाजाला योग्य दिशा देण्यासाठी मार्गदर्शन केले. त्याबद्दल सर्व सन्माननीय सदस्यांचे मा. व्यवस्थापन मंडळाचे सदस्य सचिव तथा कुलसचिव यांनी आभार मानले. मा. अध्यक्ष तथा मा. कुलगुरूंच्या मान्यतेने सभा समाप्त झाली असे घोषित करण्यात आले.** |

**कुलगुरू तथा अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**

**कुलसचिव तथा सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**